**नि.फौ.ख.क्र. ९४/२०२५**
**सरकार वि. अमोल मोरे**
**निशाणी क्र.३९ लगत**

**सा.क्र.३ चा उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.पी.पी.जाधव यांचे मार्फत शपथेवर सुरु–**

४. मला सांगता येणार नाही की, माझा जे.सी.बी. हा शरयु कारखान्यामध्ये राखयार्ड परिसरामध्ये कामासाठी लावलेला होता याचा कागदोपत्री पुरावा मी तपास अधिकारी यांना दिला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, अमोल रासकर हा माझा सख्खा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, चेतन दत्तात्रय जाधव हा माझा गाववाला आहे. तो माझ्या जास्त ओळखीचा नाही. मी चेतन जाधव याला पाहिल्यास ओळखू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जुन नवनाथ कोळेकर हा माझा मित्र आहे. मी त्याला न्यायालयामध्ये केसकामी आल्यानंतर पाहिले आहे, त्यापूर्वी पाहिले नव्हते. तपासी अंमलदार बनकर साहेब कोठे राहतात हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी फिर्याद ही बनकर साहेब असताना लिहून घेतली होती. फिर्याद देताना मी, जे.सी.बी. ऑपरेटर, बनकर साहेब असे हजर होते. मला सांगता येणार नाही की, त्यावेळी माझा भाऊ अमोल तेथे हजर होता किंवा कसे. जे.सी.बी. ऑपरेटर याचे आडनाव पांडोळे, रा. हिंगणगांव असे आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, माझी फिर्याद बनकर साहेबांनी लिहून घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद लिहिताना मी माझे फक्त नाव सांगितले होते, उर्वरित मजकूर बनकर साहेबांनी लिहिला होता. मी सांगु शकत नाही की, बनकर साहेब हे माझे पाहुणे आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, शरयु कारखाना येथे सर्व ठिकाणी सि.सी.टी.व्ही. कॅमेरा लावलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, राखयार्ड परिसर येथे सि.सी.टी.व्ही. कॅमेरा लावलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, राखयार्ड परिसराला स्वतंत्र वॉचमन/सेक्युरिटी गार्ड असतो. राखयार्ड परिसरामध्ये वॉचमन यांना न विचारता गाडी नेवू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, राखयार्ड परिसरामध्ये गाडी घेवून

जाण्यास कोणाचीही परवानगी लागत नाही. सदर केसकामी माझे बनकर साहेबांकडे फिर्याद देताना, जे.सी.बी. ओळखताना व पंचनामा करताना असे तीन वेळा जाणे झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, या व्यतिरिक्त माझे कधीही बनकर साहेबांकडे जाणे झाले नाही. फिर्याद तारीख ११.१२.२०२३, पंचनामा तारीख १७.१२.२०२३ व जे.सी.बी. ओळखीची तारीख १८.१२.२०२३ अशा आहेत. जे.सी.बी. ओळखण्याच्या दिवशी पोलिसांनी मला जे.सी.बी. कोणी चोरुन नेला होता याची माहिती दिली. हे म्हणणे खरे आहे की, त्या व्यतिरिक्त काही झाले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्याची फिर्यादीची तारीख चुकीने ११.१२.२०२३ सांगितली आहे. ती दि.१६.१२.२०२३ अशी आहे. (यावर आरोपीच्या विधीज्ञांनी आक्षेप नोंदवला की, साक्षीदाराने अगोदर सदर प्रश्नाचे उत्तर दिले आहे, त्यास पुन्हा त्याबाबत काही सांगता येणार नाही, साक्षीदारास फिर्यादच्या तारखेबाबत पुन्हा प्रश्न विचारलेला नाही.)

६. पंचनाम्यासाठी मी सकाळी १०.३० ते ११.०० वाजता गेलो होतो. मी १२.०० वाजेपर्यंत घटनास्थळी होतो. मी एकटा पंचनाम्यासाठी गेलो होतो. पंचनाम्याच्या ठिकाणी चार ते पाच लोक होते. मला पंचनाम्याच्या ठिकाणाचा गट क्रमांक सांगता येणार नाही. मी पंचनामा करताना पोलिसांना गट क्रमांक सांगितला नव्हता. मी पंचनाम्याचा नकाशा तयार करा असे सांगितले नव्हते. मी पंचनामा करताना जागेच्या चतुःसिमा सांगितल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा करताना जी पाच लोक हजर होते त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यात काय नमुद आहे याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, शरयु कारखाना हा बिबी या गावामध्ये येतो. शरयु कारखाना हा ७/१२ उता–यावर अविनाश भापकर यांच्या नावावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, उता–यावर अजुन कोणाचे नाव आहे हे मला सांगता येणार नाही. मी सदर उतारा पोलिसांना दिलेला नाही.

७. मला माहित नाही की, बनकर पोलिस हे आदर्की पोलिस स्टेशनच्या दुरक्षेत्र विभागात कामाला आहेत. मी बनकर साहेब यांना जे.सी.बी.ची तक्रार देताना पहिल्यांदा भेटलो, त्यापूर्वी भेटलो नव्हतो. मी फिर्याद देताना पोलिस स्टेशनला तासभर

होतो. मला निश्चीत वेळ आठवत नाही. जे.सी.बी.ची किंमत रु.३,००,०००/– होती असे फिर्याद देताना मी पोलिसांना सांगितले होते. मी जे.सी.बी.ची किंमत अंदाजे सांगितली होती. मला जे.सी.बी. चालवता येत नाही. मला जे.सी.बी. बद्दल पुर्ण माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, जे.सी.बी. हा चावी शिवाय चालू होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, चावी नसली तरी जे.सी.बी. चालू होतो. मी राखयार्ड परिसरात आठ वर्षापासून जे.सी.बी. लावत होतो म्हणून तेथेच घटनेच्या वेळी लावला होता. मी नवनाथ लहु जगताप याला ओळखत नाही. मी त्याला न्यायालयात केस संदर्भात पाहिले आहे, यापूर्वी त्याला पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने जे.सी.बी. मिळण्यासाठी न्यायालयात फौ.कि.अर्ज क्र.६४५/२०२३ दाखल केल्याचे मला माहित आहे.

प्रश्न– तुम्ही फौ.कि.अर्ज क्र.६४५/२०२३ मध्ये जे.सी.बी. मिळण्याची मागणी केली होती काय ?

उत्तर– मी जे.सी.बी. मिळण्याची मागणी न्यायालयात केली होती. परंतु, मी कोणत्या अर्जात केली होती हे मला माहित नाही.

८. मला माहित आहे की, आरोपीने दाखल केलेला फौ.कि.अर्ज क्र. ६४५/२०२३ हा न्यायालयाने फेटाळला होता. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाने सदर अर्जामध्ये माझ्या मागणीप्रमाणे जे.सी.बी. मला ही दिला नव्हता. मला सांगता येणार नाही की, आरोपीने अर्ज मे. दुसरे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती साबळे यांच्या न्यायालयात केला होता किंवा कसे. मला सांगता येणार नाही की, मी पुन्हा जे.सी.बी. मिळण्यासाठी फौ.कि.अर्ज क्र. ७६/२०२४ सह दिवाणी न्यायाधिश तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात दाखल केला होता किंवा कसे. मला सांगता येणार नाही की, सदर अर्जामध्ये मी पूर्वीच्या अर्जाची माहिती नमुद केली नव्हती किंवा काय. मला सांगता येत नाही की, माझा सदरचा अर्ज दि.१९.०३.२०२४ रोजी न्यायालयाने नामंजूर केला होता किंवा कसे. मला सांगता येत नाही की, मी जाणुन बुजून न्यायालयाची दिशाभूल करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला होता.

९. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात मागील तारखेला नोटरी दस्त

दाखल केला आहे. सदर दस्ताची मुळ प्रत तपास अधिकारी बनकर यांना देण्यास माझी काही अडचण नव्हती. बनकर साहेबांनी मुळ प्रत पाहून मला परत दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, जे.सी.बी.चा नोंदणीकृत मालक हा आरोपी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी आरोपीची मालकी जे.सी.बी.ला दिसत आहे. मला सांगता येणार नाही की, जे.सी.बी. चा रजिस्टर्ड मालक कोण आहे. मी अमोल सेवक कोळेकर यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, अमोल कोळेकर यांनी स्टॅम्प आणून दिला होता. मी स्टॅम्प घेताना त्याच्या सोबत हजर होतो. त्यावेळी आम्ही दोघे व साक्षीदार हजर होतो. स्टॅम्प घेताना तो त्याठिकाणी लिहिला नाही, तो नोटरी ऑफिसमध्ये लिहिला होता. कोळेकर सदरचा स्टॅम्प नोटरी ऑफिसमध्ये घेवून आला होता. मला सांगता येणार नाही की, नोटरीच्या दस्तातील मजकूर कोणी लिहिला/टाईप केला आहे. मी त्यावेळी लिहून देणार हा नोंदणीकृत मालक आहे याबाबत कागद पाहिलेला नाही. मी सदर जे.सी.बी.वर त्यावेळी कर्ज असल्याची माहिती घेतली होती. त्यावेळी जे.सी.बी.वर अंदाजे २ लाखाच्या आसपास श्रीराम फायनान्स यांचे कर्ज होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी कोळेकर यांनी सदर कर्जाबाबत मला सांगितले होते. आता मला नोटरीचा दस्त दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटरीमध्ये जे.सी.बी. वर कोणतेही कर्ज नाही असे नमुद आहे. सदरचा मजकूर हा बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, नोटरी लिहून घेताना अमोल कोळेकर हा जे.सी.बी.चा मालक नव्हता हे मला माहित आहे. माझे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले आहे. माझ्या घरी इतर वाहने आहेत. मला माहित आहे की, वाहनाची मालकी आर.सी.बुक वरुन कळते.

१०. हे म्हणणे खरे आहे की, नोटरी दस्त करताना मला अमोलच्या वाहनाच्या पहिल्या नोटरीबाबत माहिती होती व त्याने वाहन नोटरीवर घेतल्याचे माहिती होते. हे म्हणणे खरे आहे की, वाहनाची मालकी नसताना त्या व्यक्तीकडून नोटरी घेता येत नाही याची मला माहिती आहे. मला सांगता येणार नाही की, वाहनाची मालकी ही नोटरी दस्तावरुन येत नाही किंवा काय. हे म्हणणे खरे आहे की, मला नोटरी करणा–या वकिलांचे नाव माहित नाही. नोटरीच्या वेळी आमच्या गावातील योगेश जाधव हा साक्षीदार होता व दुसरा साक्षीदार जमदाडे हा होता. जमदाडे हा कर्जत येथे राहणारा

होता. मी त्याचे आधारकार्ड पाहिले होते. त्याचे आधारकार्ड नोटरीस जोडले होते. माझे व अमोल कोळेकर याचे देखील आधारकार्ड जोडले होते. मला माहित नाही की, माझ्या गावातील साक्षीदाराचे आधारकार्ड जोडले होते किंवा काय. मी नोटरीसोबत वाहनाची पूर्वीची नोटरी किंवा नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की, अमोल कोळेकर याने साक्षीदारांसमक्ष मला कोणताही नोटरीचा दस्त करुन दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अमोल कोळेकर याने स्टॅम्प घेवून कोणत्याही प्रकारचा मजकूर लिहून मला दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ४० मधील नोटरी दस्तातील संपुर्ण मजकूर खोटा नमुद आहे.

१२. दि.०९.१२.२०२३ रोजी कारखान्यात जे.सी.बी. लावताना मी होतो. मी तक्रार देताना पोलिसांना सांगितले होते की, शरयु कारखाना येथील राख उचलण्याचे काम मी करीत होतो. दि.०९.१२.२०२३ रोजी माझ्या जे.सी.बी.वरील ड्रायव्हरने कारखान्यावरील राख यार्ड मधून राख भरली. काम संपल्यानंतर २.०० ते ३.०० च्या दरम्यान ड्रायव्हरने जे.सी.बी. बाजूला लावून ठेवलेला होता. त्यावेळी मी तेथे हजर होतो. जे.सी.बी. लावल्यानंतर ड्रायव्हर व मी आपापल्या घरी निघून गेलो. त्याच्या दुस–या दिवशी रविवारचा दिवस असल्याने सुट्टी असल्याने मी कारखान्यावर गेलो नाही. सदरचा जे.सी.बी. मी अमोल कोळेकर यांच्याकडून दि.०३.०७.२०२३ रोजी र.रु.४,३१,०००/– रोखीने देवून विकत घेतला होता. सदर खरेदीबाबत मी नोटरी केली होती इ. मजकूर मी पोलिसांना सांगितला होता. आता मला माझी तक्रार दाखवण्यात आली. त्यामध्ये सदरचा मजकूर का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की, शरयु कारखाना येथील राख उचलण्याचे काम मी करीत होतो, दि.०९.१२.२०२३ रोजी माझ्या जे.सी.बी.वरील ड्रायव्हरने कारखान्यावरील राख यार्ड मधून राख भरली, काम संपल्यानंतर २.०० ते ३.०० च्या दरम्यान ड्रायव्हरने जे.सी.बी. बाजूला लावून ठेवलेला होता, त्यावेळी मी तेथे हजर होतो, जे.सी.बी. लावल्यानंतर ड्रायव्हर व मी आपापल्या घरी निघून गेलो, त्याच्या

दुस–या दिवशी रविवारचा दिवस असल्याने सुट्टी असल्याने मी कारखान्यावर गेलो नाही, सदरचा जे.सी.बी. मी अमोल कोळेकर यांच्याकडून दि.०३.०७.२०२३ रोजी र.रु.४,३१,०००/– रोखीने देवून विकत घेतला होता, सदर खरेदीबाबत मी नोटरी केली होती इ. मजकूर मी खोटा सांगत आहे.

१४. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे जे.सी.बी. चालविण्याचा परवाना नाही. दि.११.१२.२०२३ रोजी जे.सी.बी. जागेवर नसल्याचे मला समजल्यानंतर मी त्या दिवशी पोलिस स्टेशनला तक्रार दयावयास गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.१६.१२.२०२३ पर्यंत मी तक्रार दिली नव्हती. मला माहित नाही की, श्रीराम फायनान्स यांनी दि.१०.१२.२०२३ किंवा ११.१२.२०२३ रोजी सदरचा जे.सी.बी. हा कर्ज थकवल्यामुळे ओढून नेला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि.१०.१२.२०२३ ला जे.सी.बी. हा श्रीराम फायनान्सने ओढून नेला होता याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा भाऊ अमोल असे दोघे श्रीराम फायनान्सचे कर्मचारी अहिवळे व माने यांच्याकडे माहिती घेण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तक्रार देण्यापूर्वी सदरचा जे.सी.बी. हा फायनान्स वाल्यांनी ओढून नेला होता याची मला माहिती होती. मला माहित नाही की, जे.सी.बी.चे थकीत कर्ज हे अमोल मोरे यांनी भरुन जे.सी.बी. त्यांच्या ताब्यात घेतला होता किंवा कसे. मी श्रीराम फायनान्स कंपनीकडे गेलो होतो, परंतु मला त्याची निश्चीत तारीख माहिती नाही. मी तक्रार दाखल केल्यानंतर श्रीराम फायनान्सकडे गेलो होतो. मी फायनान्सवाल्यांकडे जे.सी.बी. ची मागणी केली होती. मला फायनान्स वाल्यांनी जे.सी.बी दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फायनान्स वाल्यांनी जे.सी.बी. मला दिला नाही याचा राग मनात धरुन मी सदरची तक्रार दाखल केली आहे.

१५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने जे.सी.बी. चोरुन नेला आहे हे मी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. आदर्की पोलिस स्टेशन ते राखयार्ड परिसर यातील अंतर १० किमी आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा आदर्की पोलिस स्टेशन किंवा लोणंद पो.स्टे. येथे लिहिला. घटनास्थळ पंचनाम्यावरील सहया हया आदर्की किंवा लोणंद

पोलिस स्टेशनला केल्या नाहीत, त्या घटनास्थळी केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जे.सी.बी. हा पोलिसांनी कोणत्या ठिकाणाहून कोणासमक्ष पंचनामा करुन आणला हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे.सी.बी. पोलिस स्टेशनला आणल्यानंतर मी तेथे गेलो होतो. मला सांगता येणार नाही की, जे.सी.बी. कोणत्या तारखेला पोलिस स्टेशनला आणला. जे.सी.बी. हा लोणंद पोलिस स्टेशनला आणला होता. मला माझ्या भावाने जे.सी.बी. पोलिस स्टेशनला आणल्याचे सांगितले होते.

१६. मला सांगता येणार नाही की, जे.सी.बी.चा मी नोंदणीकृत मालक नाही किंवा कसे. मी जे.सी.बी.चा मालक आहे. हे म्हणणे खरे आहे की, नोंदणी झाल्याशिवाय वाहनाची मालकी येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे.सी.बी. ची कोणतीही नोंदणी माझ्या नावावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, जे.सी.बी.चा मी मालक नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जे.सी.बी.चा मालक नसल्याने मला फिर्याद दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दृष्टीने मी जे.सी.बी. चा मालक आहे.

१७. हे म्हणणे खरे आहे की, जे.सी.बी. लावताना मी व जे.सी.बी. ऑपरेटर असे दोघेच होतो, दुसरे कोणीच नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, कारखान्यामध्ये प्रवेश करावयाचा असल्यास गेट पास शिवाय प्रवेश करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कारखान्याच्या कोणत्याही भागात जायचे असल्यास अगोदर परवानगी घ्यावी लागते. कारखान्याच्या कोणत्या भागात जाण्यास परवानगी लागते व कोणत्या भागात परवानगी लागत नाही याची मला माहिती आहे. कारखान्याचे अंदाजे पाच भाग आहेत. मला आता आठवत नाही की, दि.१८.१२.२०२३ रोजी मला कोणाचा फोन आला होता, त्याचे नाव मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे.सी.बी. ओळखीसाठी मला कोणत्या पोलिसांनी बोलावले, मला त्याचे नाव सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला जे.सी.बी. दाखवला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलिसांनी सांगितले आरोपीने व फायनान्सवाल्यांनी जे.सी.बी. नेला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या साक्षीतील सरतपासातील संपुर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे

म्हणणे खरे नाही की, मी खोटया मजकुराची तक्रार व छापील तक्रार दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी, अमोल कोळेकर व पोलिसांनी संगनमत करुन आरोपीविरुद्ध खोटा गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस.साटोटे)

ता.३०.०८.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण.

(न्यायालय क्र.३)